## गोंदिया-हैदराबाद उड्डाणसेवा आठवड्यातून तीनच दिवस

**गोंदिया :** विमानसेवेत उदभवणाऱ्या समस्या आणि काही दिवसांपुर्वी अहमदाबाद येथे झालेल्या विमान दुर्घटनेमुळे हवाई प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. विमान कंपन्याही पूर्वीपेक्षा अधिक सावध झाल्या आहेत आणि विमानांच्या देखभाल आणि तांत्रिक तपासणीसाठी खबरदारी घेतली जात आहे.

याच अनुषंगाने गोंदिया जवळील बिरसी विमानतळावरून दररोज उड्डाण भरणारी गोंदिया-हैदराबाद विमानसेवा आता आठवडयातून तीनच दिवस देण्याचा निर्णय इंडिगो विमान कंपनीने घेतला आहे. येत्या २ जुलैपासून पुढील निर्णयापर्यंत बिरसी विमानतळावरून दररोज चालवल्या जाणाऱ्या इंडिगो विमान कंपनीचे विमान आता आठवड्यातून फक्त तीनच दिवस म्हणजे मंगळवार, गुरूवार व शनिवार या वारी हैदराबादसाठी उड्डाण भरेल. असे गोंदिया विमानतळ प्राधिकरणाने त्यांच्या ट्विटर हँडलवरून कळविले आहे. यासंदर्भात बिरसी विमानतळ प्राधिकरणाचे संचालक गिरीशचंद वर्मा यांनी सांगीतले की हा निर्णय इंडिगोचा आहे. विमानतळ दररोज अधिक उड्डाण सेवा देण्यास सक्षम आहे. जुलैच्या अखेरीस रात्रीची सेवा सुरू करण्याचे कामही सुरू असल्याचे त्यांनी सांगीतले. इंडिगोच्या बिरसी विमानतळाच्या व्यवस्थापक यांनी सांगीतले की, इंडिगोची हैदराबादला जाणारी दैनंदिन विमानसेवा आता २ जुलैपासून मंगळवार, गुरुवार आणि शनिवारी सुरू राहील. विमानाच्या वेळेत कोणताही बदल केलेला नाही.

महासागर
जिल्हा कार्यालय, गोंदिया
जिल्हा प्रतिनिधी
जयंत शुक्ला
पत्ता : दुसरा माळा, गौरक्षण मार्केट, गांधी प्रतीमा चौक, गोंदिया
संपर्क क्र ९८२२३८६९९९

## दृष्टिक्षेप

### ३.७४ लाखाची अफरातफर

**आमगाव :** कर्ज हप्त्याची वसूली करून ते संस्थेत जमा न करता परस्पर विल्हेवाट लावून संस्थेला ३ लाख ७४ हजार ५९५ रूपयाची अफरातफर करून चुना लावला. ही घटना १ मार्च २०२४ ते १३ मे २०२५ या दरम्यानची आहे. या प्रकरणी आमगाव पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सविस्तर असे की, इंसाफ को-ऑप.बँक आमगावच्या वतीने वाटप करण्यात आलेल्या कर्ज वसुलीचे काम कस्टमर सर्विस ऑफिसर म्हणून कार्यरत असलेला आरोपीकडे होते. कर्जाचे हप्ते वसुली करताना आरोपीने १०३ सदस्यांकडून ३ लाख ७४ हजार ५९५ रुपए वसुल केले. परंतु, ग्राहकांशी पैसे घेवून पावती दिली नाही तसेच पैसे बँकेत जमा न करता परस्पर विल्हेवाट लावली. हे प्रकरण उघडकीस येताच अफरातफर झाल्याचे समोर आले. फिर्यादी विलास हेमराज नेवारे (३३) याच्या तक्रारीवरून आरोपीविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि डाबेराव करीत आहे.

### भाकपच्या राज्य कार्यकारिणीत रहांगडाले यांची निवड

**गोंदिया :** भारतीय कम्युनिस्ट पार्टी महाराष्ट्र राज्याच्या कार्यकारिणीत सलग सहाव्यांदा गोरेगाव येथील हौसलाल रहांगडाले यांची निवड करण्यात आली आहे. नाशिक येथे २४ जून रोजी पार पडलेल्या राज्य अधिवेशनात त्यांची निवड करण्यात आली तर मिलींद गणवीर यांची राज्य कॉन्सिलवर निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल रामचंद्र पाटील, करूना गणवीर, परेश दुरूगवार, अशोक मेश्राम, कल्पना डोगरे, शालूबाई कुथे, प्रल्हाद उके, शेखर कनोजिया, गुनवत राव नाईक, सुरेश रंगारी आदीनी अभिनंदन केले आहे.

### दागिण्यांसह रोख लंपास

**गोंदिया :** नजिकच्या फुलचूर येथील आंबाटोली वॉर्ड क्र.२ येथे अज्ञात चोरट्यांनी सुना मौका साधून घरात ठेवलेले सोने-चांदीचे दागिण्यासह रोख रक्कम लंपास केली. ही घटना २५ ते २८ जून दरम्यानची आहे. फिर्यादी जगदिश हिरालाल बघेले रा.छोटा गोंदिया यांच्या तक्रारीवरून गोंदिया ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोहवा दशरिया करीत आहेत.

### पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतीचे भूमिपूजन

**अर्जुनी/मोर :** तालुक्यातील बोंडगावदेवी ६५ लाखाच्या निधीतून पशुवैद्यकीय दवाखाना तयार करण्यात येणार आहे. या नव्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतीचे भूमिपूजन आज, १५ जून रोजी जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. या नव्या दवाखान्याच्या उभारणीमुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या जनावरांना वेळेवर व दर्जेदार उपचार मिळणार असून, पशुधनाच्या आरोग्य सुधारासाठी हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.भूमिपूजन सोहळ्याला पं.स.उपसभापती संदीप कापगते, पं.स.सदस्य कुंदाताई लोगडे, सरपंच प्रतिभाताई बोरकर, सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष रत्नाकर बोरकर, पोलीस पाटील मंगलाताई रामटेके, माजी सरपंच राधेश्याम झोडे, अमरचंद ठवरे, ग्रा.पं.सदस्य मायाताई मेश्राम, कृष्णा झोडे, कृष्णा खंडाईत, रवी बनपूरकर, माणिक मेंढे, पशुधन अधिकारी राठोड, कैलास धावडे, शहारे, ग्रामसेवक परमार, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोंदिया जिल्हा बँकेवर पुन्हा महायुतीचे वर्चस्व

## महायुती ११ तर आघाडीचे ९ संचालक विजयी





**प्रतिनिधी / गोंदिया**

गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदाकरीता झालेल्या निवडणूकीत ११ संचालक महायुतीचे तर ९ संचालक हे महाविकास आघाडी व सेवा सहकारी समर्थित पॅनलचे निवडून आले आहेत. या निवडणूकीत माजी आमदार दिलीप बनसोड यांच्यासह बँकेचे उपाध्यक्ष राधेलाल पटले, संचालक उषा मेंढे, रेखलाल टेंभरे, राजकुमार कुथे, राजू एन.जैन, गजानन परशुरामकर या दिग्गजांना पराभवाचा फटका बसला.

आज ३० जून रोजी झालेल्या निवडणूकीच्या मतमोजणीत सेवा सहकारी तालुका गटातून आमगाव- भेरसिंग नागपुरे (महायुती), देवरी-प्रमोद संगीडवार (महायुती), सालेकसा बंटी कटरे (महविकास आघाडी), गोंदिया केतन तूरकर (महायुती), सड़क/अर्जुनी-गंगाधर परशुरामकर (महविकास आघाडी परिवर्तन पॅनल), गोरेगांव-दुर्गाप्रसाद ठाकरे (महविकास आघाडी परिवर्तन पॅनल), तिरोड़ा-आमदार विजय रहांगडाले (महायुती), औद्योगिक-अरुण दुबे (महविकास आघाडी परिवर्तन पॅनल), मोरगांव/अर्जुनी-केवळराम पुस्तोडे (महायुती), दूध संघ गट पंकज यादव (महविकास आघाडी परिवर्तन पॅनल), मजूर संघ गट-विजयसिंह राठोड (महविकास आघाडी परिवर्तन पॅनल), जंगल कामगार अशोक गप्पू गुप्ता (महविकास आघाडी परिवर्तन पॅनल), मच्छीमार



संघ गट- अजय हलमारे (महविकास आघाडी परिवर्तन पॅनल), ओबीसी गट डॉ.अविनाश जायसवाल, महिला गट रचना गहाणे, प्रिया हरिणखेड़े, अनु.जाती जमाती गट आमदार राजकुमार बडोले, व्हीजेएनटी गट विनोद कन्नमवार(महायुती), वैयक्तीक मतदार गटातून प्रफुल्ल अग्रवाल (महविकास आघाडी परिवर्तन पॅनल निर्विरोध) व पगारदार गटातून राजेंद्र जैन (महायुती निर्विरोध) विजयी झाले. महायुतीप्रणित सहकार आघाडीने ११ जागा जिंकत बँकेवर आपले वर्चस्व कायम ठेवले असून माजी अध्यक्ष राजेंद्र जैन हे पुन्हा अध्यक्षपदी विराजमान होण्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. महायुतीच्या मातब्बर नेत्यांनी आखलेल्या व्हुवरचनेवर सत्तेबाहेर असलेल्या काँग्रेस महाविकास आघाडीने चांगली कामगिरी करीत ९ संचालक निवडून आणल्याने एकतर्फी विजयाचा सहकार पॅनलचा बेत उडविण्यात महाविकास आघाडीला यश आले आहे.

| पगारदार व पत्तसंस्था संघ |
|---|
| राजेंद्र जैन - अविरोध |
| वैयक्तीक मतदार संघ |
| प्रफुल्ल अग्रवाल - अविरोध |
| औद्यो. व बलुतेदार संघ |
| अरूण दुबे - ५२ (विजयी) |
| रेखलाल टेंभरे - २९ |
| मार्केटिंग व जंगल कामगार |
| अशोक गुप्ता - ३० (विजयी) |
| मृत्यूंजय सिंह - १४ |
| दुग्ध सह. संस्था संघ |
| पंकज यादव - १५ (विजयी) |
| राजकुमार कुथे - १२ |
| मत्स्य सह. संस्था संघ |
| अजय हलमारे - ३९ (विजयी) |
| सावलराव मारबते - ३७ |

| राखीव प्रतिनिधी ( जिल्हा) |
|---|
| अनु.जाती/जमाती |
| राजकुमार बडोले - ४३५ (विजयी) |
| दिलीप बंसोड - ४२३ |
| महिला प्रतिनिधी |
| प्रिया हरिणखेडे - ४५३ (विजयी) |
| रचना गहाणे - ३८७ (विजयी) |
| उषाताई मेंढे - ३८५ |
| ज्योती पटले - ३७७ |
| वि.जा./भ.ज. |
| विनोद कन्नमवार - ५५५ (विजयी) |
| दामोदर नेवारे - २९७ |
| रघुनाथ मेश्राम - ८ |
| इतर मागास वर्ग |
| अविनाश जायस्वाल - ४५८ (विजयी) |
| राधेलाल पटले - ४०३ |

| सेवा सह. मतदार संघ |
|---|
| गोंदिया |
| केतन तुरकर - ३९ (विजयी) |
| संजय चौधरी - २३ |
| आमगाव |
| भेरसिंह नागपूरे - २६ (विजयी) |
| सुभाष आकरे - २१ |
| सालेकसा |
| येजेंद्र कटरे - १५ (विजयी) |
| प्रभाकर दोनोडे - ९ |
| देवरी |
| प्रमोद संगिडवार - ९ (विजयी) |
| गोपाल तिराले - ५ |
| सडक/अर्जुनी |
| गंगाधर परशुरामकर - १३ (विजयी) |
| गजानन परशुरामकर - १२ |
| गोरेगाव |
| दुर्गाप्रसाद ठाकरे - २६ (विजयी) |
| योजराज पारधी - २३ |
| तिरोडा |
| विजय रहांगडाले - ५६ (विजयी) |
| वंदना अंबुले - १० |
| अर्जुनी/मोरगाव |
| केवळराम पुस्तोडे - २७ (विजयी) |
| विजया कापगते - १३ |

## हरविलेले मोबाईल मुळ मालकांच्या स्वाधीन

**प्रतिनिधी / गोंदिया**

गोंदिया शहर पोलीस ठाणे हद्दीतून मागील २ महिन्यात वेगवेगळ्या ठिकाणाहून वेगवेगळे कंपनीचे अँड्राईड मोबाईल हँडसेट हरविल्याच्या तक्रारी गोंदिया शहर पोलीस ठाणे येथे प्राप्त झालेले होते. सदर तक्रारीची नोंद होताच पोलिसांकडून हरविलेल्या मोबाईलचा तांत्रिक पध्दतीचा अवलंब करीत शोध घेणे सुरू झाले. दरम्यान पोलिसांच्या तपासकार्याला यश आले असून ४ लाख ६० हजार रुपए किंमतीचे ५१ मोबाईल संच शोधून काढले. दरम्यान वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोनि किशोर पर्वते यांच्या मार्गदर्शनाखाली मुळ मालकांना शोधून काढलेले मोबाईल परत करण्यात आले.

शहर पोलिस ठाणे हद्दीत मोबाईल हरविणे, चोरी जाण्याच्या तक्रारी नोंद करण्यात आल्या होत्या. या तक्रारीची पोलीस निरीक्षक किशोर पर्वते यांनी गंभीर दखल घेऊन त्यांच्या अधिनस्त गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अंमलदार यांना मार्गदर्शन करून हरवलेल्या मोबाईलचे शास्त्रोक्त पद्धतीने शोध घेण्याच्या सुचना केल्यात. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अंमलदार पोशि- अशोक रहांगडाले यांनी हरविलेल्या मोबाईलचे केंद्र शासनाच्या सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर या आप्लिकेशन/पोर्टल वर हरविलेले मोबाईलचे अर्ज अपलोड करून गोंदिया शहर डीबी पथकासह पोलीस ठाणे हद्दीतून हरविलेले ५१ मोबाईल शोधून काढले. सदर मोबाईलची किंमत ४ लाख ६० हजार रुपए आहे. दरम्यान मुळ मालकांना पाचारण करून २९ जून रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी रोहिणी बानकर, पोलीस निरीक्षक किशोर पर्वते, सपोनी हनवते व पोउपनि डोंगरवार यांच्या हस्ते मूळ मालकांना परत करण्यात आले. ही कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गोंदिया शहरचे पोलीस निरिक्षक किशोर पर्वते यांच्या नेतृत्वात डी.बी. पथकाचे पो.हवा. कवलपालसिंग भाटीया, दिपक रहांगडाले, सुदेश टेंभरे, सतीश शेंडे, निशिकांत लोंदासे, प्रमोद चव्हाण, पो.शि. अशोक रहांगडाले, दिनेश बिसेन, सुभाष सोनवाने, मुकेश रावते, राकेश बंजारे, सोनु नागपुरे, प्रमोद शेंडे तसेच सायबर सेल येथील योगेश रहिले, रोशन येरणे यांनी केली.

## अंगणातून दुचाकी लंपास

**गोंदिया :** ग्रामीण पोलिस ठाण्यातंर्गत तुमखेडा/बु. येथे अंगणात ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. ही घटना २७ व २८ जून दरम्यानची आहे. फिर्यादी दिपक कुंवरलाल रहांगडाले (५९) रा.तुमखेडा बु. यांनी दुचाकी क्र.एमएच-३५/झेड-३९५८ अंगणात ठेवली होती. अज्ञात चोरट्यांनी डाव साधून दुचाकी चोरून नेली. चोरीस गेलेली दुचाकी २० हजार रुपए किंमतीची होती. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास पोहवा भैसारे करीत आहेत.



## माधवझरी ऐवजी नवेगावबांध जलाशयात अरण्यऋषींचे अस्थी विसर्जन

**प्रतिनिधी/ गोंदिया**

नवेगावबांधला ओळख मिळवून देणारे प्रसिद्ध पक्षितज्ज्ञ पद्मश्री तथा अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांचे १८ जून रोजी सोलापूर येथे निधन झाले. त्यांच्या अंतिम इच्छेनुसार त्यांच्या अस्थी गोंदिया जिल्ह्यातील माधवझरी येथील माधवराव पाटील डोंगरवार यांच्या समाधिस्थळाच्या शेजारी विसावणार होत्या. मात्र, वनविभागाची परवानगी न मिळाल्याने शुक्रवारी (दि.२७) त्यांच्या अस्थी नवेगावबांध येथील जलाशयात विसर्जित करण्यात आल्या.तर तसेच माधवझरी येथील माधवराव पाटील डोंगरवार यांच्या समाधी शेजारी वटवृक्षाचे रोपण करण्यात आले.



पद्मश्री मारुती चितमपल्ली यांचे नवेगावबांधसोबत अनोखे नाते होते. त्यांनी वनाधिकारी म्हणून येथे जवळपास १२ वर्षे सेवा दिली. या काळात पवनीधाबे येथील त्यांचे गुरू माधवराव पाटील डोंगरवार यांच्याशी त्यांचे फार जिव्हाळ्याचे संबंध होते. माधवराव पाटील यांनी चितमपल्ली यांना या जंगल परिसराची सखोल माहिती दिली. वन्यप्राण्यांना पाण्याची चणचण भासू नये यासाठी माधवझरी परिसर निर्माण केला. माधवराव पाटील यांचे निधन झाल्यानंतर याच परिसरात त्यांचा अंत्यविधी पार पडला होता. त्यामुळे मारुती चितमपल्ली यांनीसुद्धा माझ्याही अस्थी याच परिसरात पुरण्यात याव्यात, अशी इच्छा व्यक्त केली होती.

# महिलेचा मृत्यू नैसर्गिक की खून?

## संशयामुळे मृतदेह उकरून बाहेर काढला, शवविच्छेदनासाठी पाठवला

**प्रतिनिधी / गोंदिया**

अनेक दिवस आजारी असलेल्या महिलेचा मृत्यू नैसर्गिक नसून खून झाला असावा, या संशयावरून पोलिसांनी मृतदेह उकरून काढल्याची घटना तालुक्यातील ग्राम दासगाव बुज येथे रविवारी (दि. २९) घडली. भारती सुरेंद्र शहारे (४५, रा. दासगाव बुज), असे मृत महिलेचे नाव आहे. भारती गेल्या काही दिवसांपासून आजारी होत्या. शुक्रवारी (दि. २७) त्यांचा मृत्यू झाल्यानंतर नातेवाइकांनी हा आजारपणामुळेच मृत्यू झाला असावा, असे समजून गावातील स्मशानभूमीत दफन विधी करून अंत्यसंस्कार केले होते.

मात्र, या मृत्यूमागे काहीतरी काळेबेरं असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. विशेष म्हणजे, मृत महिलेच्या १७ वर्षीय मुलाने तिचा खून केल्याचा संशय पोलिसांना आहे. त्यामुळे पोलिसांनी गंभीरतेने दखल घेत शनिवारी (दि. २८) मुलाचा शोध घेतला. तसेच रविवारी (दि.२९) पोलिसांनी घटनास्थळी जाऊन तालुका दंडाधिकारी समशेर पठाण यांच्या उपस्थितीत मृतदेह उकरून बाहेर काढला. यानंतर शवविच्छेदनासाठी मृतदेह येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाठविण्यात आला आहे.

शवविच्छेदन अहवाल येईपर्यंत मृत्यूचा प्रकार स्पष्ट होणार नाही. तोपर्यंत सर्व शक्य त्या बाजूंनी तपास केला जात आहे. मृत्यू नैसर्गिक आहे की खून हे अहवालानंतरच कळेल, असे पोलिसांचे म्हणणे आहे.

### अहवालानंतर ठरेल तपासाची दिशा

**भारती शहारे यांचा गावातील स्मशान भूमीत दफनविधी करण्यात आला होता. परंतु पोलिसांनी तो मृतदेह रविवारी उकरून तपासणीसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नेला. उत्तरीय तपासणीत तिच्या मृत्यूचे कारण कोणते, हे कळेल.**



### अंडी विकून भरायची पोट

**पतीच्या निधनानंतर मुलगा व आई घरी राहायची. परंतु काही दिवसांपासून मुलगाही नागपूरला राहायचा. अधून-मधून तो गावाला येत असे. भारती शहारे गावातच फिंगर आणि अंडी विकून आपले पोट भरायची. मुलगा गावाला आला आणि आईचा मृत्यू झाला. पहिल्या दिवशी तिचा नैसर्गिक मृत्यू झाल्याचे नातेवाईक व गावकऱ्यांना वाटले. परंतु पोलिसांना मिळालेल्या विश्वसनीय माहितीवरून तिचा खून झाल्याचा दाट संशय बळावला अन्न तो मृतदेह उकरून काढला.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम .(विद्युत) विभाग, नागपूर**

**ई-निविदा सुचना क्रमांक ३८ सन २०२५-२६**(फेर निविदा)

**कार्यकारी. अभियंता , सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, बांधकाम संकुल, सिव्हील लाईन्स, नागपूर** (दुरध्वनी क्र. ०७१२-२५६०८५६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील (क्र. १ ते ५) कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागव त आहेत. निविदा कागदपत्र संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता , सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, नागपूर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| Sr. No. | Name of Work | Tender Amount (In figure) | Tender Amount (In words) | EMD Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | Estimate No 1652/NGP/2024-25:- Providing Supply, Installation, Testing & Commissioning of IOT Based Smart Optimizers at Government Medical College, Nagpur.(Recall) | 107874763/- | Ten core seventy eight lac seventy four thousand seven hundred sixty three | 539400/- |
| 2 | Estimate No 1651/NGP/2024-25:- Providing Supply, Installation, Testing & Commissioning of IOT Based Smart Optimizers at Indira Gandhi Government Medical College & Hospital, Nagpur.(Recall) | 74739978/- | Seven core forty seven lac thirty nine thousand nine hundred seventy eight | 373800/- |
| 3 | Estimate No 1650/GND/2024-25:- Providing Supply, Installation, Testing & Commissioning of IOT Based Smart Optimizers at Government Medical College Gondia Dist. Gondia.(Recall) | 47067102/- | Four core seventy lac sixty seven thousand one hundred two | 235400/- |
| 4 | Estimate No 1744/NGP/2024-25:- Providing E.I, Submersible Pumps, Heat Pump & Fire Fighting System to Newly Constructed 8 Nos. Waiting Room in the Premises of Government Medical College & Hospital, Nagpur.(Recall) | 10305850/- | One core three lac five thousand eight hundred fifty | 103100/- |
| 5 | Estimate No.309/NGP/2025-26:- Providing Internal and External E.I. with Provision for CCTV System, Fire Fighting, Other Items, Heat Pump, Solar Water Heating System, HVAC+ Forced Air Ventilation, Telephone, TV & Data System, Lift, DG Set, Solar Generation, Sub Station, Street Light etc.at Joti building VIP and VVIP Guest House at Nagpur.(Recall) | 24237340/- | Two core forty two lac thirty seven thousand three hundred forty | 150000/- |

निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक ३०/०६/२०२५ ते ०७/०७/२०२५ निविदा उघडण्याची दि. ०८/०७/२०२५ स. १० वा.
खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
१.www.mahatenders.gov.in (NIC portal)
( सदर निविदेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
२.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, नागपूर कार्यालयातील सुचना फलक.

**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बाधंकाम (विद्युत) विभाग,**
**नागपूर**

DGIPR-2025-26/No.-5/C1423

## आता रेल्वे स्टेशनवर मिळणार विविध सुविधा

**गोंदिया :** राज्य शसनाच्या महत्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेतंर्गत महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याकरिता एक महत्वाचे पाऊल उचलत आहे. या योजनेतून महिलांसाठी नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्याची अंमलबजावणी लवकरच करण्यात येणार आहे.

सदरील पतसंस्था महिला सभासदांच्या सक्रीय सहभागातून स्थापन होतील. त्यासाठी शासनाच्या ८ मार्च २०१९ च्या परिपत्रकातील निकषानुसार नोंदणी प्रक्रीया राबविली जाईल. या परिपत्रकानुसार शहर भागात पतसंस्थेसाठी किमान ५०० महिला सभासद आणि पाच लाख रुपये भांडवल. तर ग्रामीण भागात २५० सभासदांसह १.५ लाख रुपयांचे भांडवल आणि तालुकास्तरावर ५०० सभासदांसाठी पाच लाख रुपये तर जिल्हास्तरावर १५०० महिला सभासदांसह १० लाख रुपये भांडवल आवश्यक आहे. या उपक्रमाची अंमलबजावणी महिला व बाल विकास विभाग, महिला आर्थिक महामंडळ आणि सहकार विभाग यांच्या संयुक्त समन्वयाने केली जाणार आहे. महिला व बाल विकास विभाग पात्र महिलांची यादी प्रमाणित करेल. त्यानंतरच पतसंस्था नोंदणीस पात्र ठरेल. लाडकी बहिण योजना ही केवळ आर्थिक मदतीपुरतीच मर्यादीत नसून ती महिलांच्या आत्मविश्वास, नेतृत्व आणि स्वयंपूर्ततेचे प्रतीक ठरत आहे. या पतसंस्था स्थापन झाल्यानंतर महिलांना उद्योगासाठी आवश्यक निधी सहज उपलब्ध होणार असून यामुळे स्थानिक महिलांना उद्योजकतेला मोठा आधार मिळेल. असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने सहकार विळभागाने लाडकी बहिण योजनेतून एक नाविण्यापूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. यामुळे महिलांरना आर्थिक मदत, पतपुरवठा व व्यवसाय विकासाठी आवश्यक सहाय्य मिळेल.

# ४० कोटींच्या निधीअभावी जलजीवनची ६०३ कामे मंदगतीने

### तीन वर्षांपासून निधी मिळेना ; आतापर्यंत मिळाले केवळ १६ कोटी



**गोंदिया :** जि.प. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाअंतर्गत 'हर घर नल से जल' योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेची १०६३ कामे मंजूर करण्यात आली; पण या कामासाठी निधी मिळत नसल्याने ही कामे फारच संथ गतीने सुरू आहेत. या विभागाने शासनाकडे वारंवार ४० कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली; पण हा निधी मिळत नसल्याने ही कामे फारच संथगतीने सुरू असल्याची बाब पुढे आली आहे.

उन्हाळ्याच्या दिवसांत गावागावांत पाणीटंचाईची समस्या निर्माण होते. शिवाय बऱ्याच गावांत पाणीपुरवठा योजना नसल्याने नागरिकांना अशुद्ध पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. ही समस्या मार्गी लावण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने 'हर घर नल से जल' योजनेची अंमलबजावणी जि.प.ग्रामीण पाणीपुरवठा विभागाअंतर्गत करण्यात आली. याअंतर्गत गोंदिया जिल्ह्यात एकूण १०६३ कामांना मंजूर करण्यात आली. गेल्या दोन-तीन वर्षात यापैकी ४६६ कामे पूर्ण करण्यात आली. तर ६०३ कामे अद्यापही अपूर्ण आहेत. या कामासाठी शासनाकडून वेळेवर निधी उपलब्ध होत नसल्याने ही कामे खोळंबली आहेत. बऱ्याच कामांचे कंत्राटदारांची देयके थकल्याने त्यांनी कामे थांबविली आहेत. तर काहींनी ती संथ गतीने सुरू ठेवली आहेत. याचा फटका मात्र गावकऱ्यांना सहन करावा लागत आहे. पाणीपुरवठा योजनेची ६०३ कामे प्रलंबित असल्याने गावकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळण्यापासून वंचित राहावे लागत आहे.

### निधीची मागणी; पण तो मिळेना

जि.प. ग्रामीण पुरवठा विभागाकडून शासनाला वांरवार निधीची मागणी केली जात आहे. या कामासाठी त्वरित ४० कोटी रुपयांच्या निधीची रुपयांच्या निधीची गरज आहे. तर शासनाने यापूर्वी मार्चमध्ये ८ कोटी आणि एप्रिलमध्ये ८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता; पण तेवढ्या निधीतून ही कामे पूर्ण करणे शक्य नसल्याने हा विभागसुद्धा अडचणीत आला आहे.

## यंदा युरियाचा १६५० मेट्रिक टन 'बफर स्टॉक' राहणार



**गोंदिया :** दरवर्षी पेरणीच्या काळात खतांचा तुडवडा निर्माण होतो व त्यात युरियाला जास्त मागणी राहते असे दिसून येते. याचा फायदा विक्रेत्यांकडून घेतला जात असून जादा दरात शेतकऱ्यांना खतांची विक्री केली जाते. यावर मात करण्यासाठी कृषी विभागाने खतांचा 'बफर स्टॉक' करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये युरियाचा एक हजार ६५० मेट्रिक टन 'बफर स्टॉक' कृषी विभागाकडून केला जाणार आहे.

कृषी विभागाने यंदा ९७ हजार ३५३ मेट्रिक टन खतांची मागणी केली होती. मात्र, आयुक्तालयाकडून ७६ हजार ९०७ मेट्रिक टन खतांचे आवंटन मंजूर करण्यात आले. त्यानुसार जिल्ह्याला खतांचा पुरवठा सुरू झाला आहे. आता पावसाने हजेरी लावली असून शेतीची कामे जोर धरणार. अशात शेतकऱ्यांना खतांची गरज भासणार असून मागणी वाढणार आहे. अशात कित्येकदा खतांचा तुटवडा निर्माण होत असून याचा फायदा विक्रेते घेतात. जादा दरात शेतकऱ्यांना खतांची विक्री केली जाते. या प्रकारावर आळा बसावा यासाठी यंदा कृषी विभागाने खतांचा 'बफर स्टॉक' करण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये युरियाचा एक हजार ६५० मेट्रिक टन एवढा 'बफर स्टॉक' केला जाणार आहे.

## शाळेच्या पहिला दिवस थाटामाटात



**साखरीटोला :** वीर बिरसा मुंडा आदिवासी आश्रम शाळा सालेकसा येथे २७ जून रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी उत्साहवर्धक वातावरणात थाटामाटात प्रवेशोत्सव सोहळा साजरा करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.राजेंद्र बडोले होते. अतिथी म्हणून सौ. शालिनीताई बडोले, गृहपाल मीनाक्षी बढे, माध्यमिक मुख्याध्यापक एच.ए.चौधरी, प्राथमिक मुख्याध्यापक पी.एस.लोथे प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ.बडोले यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीविषयी मार्गदर्शन केले. सौ. बडोले यांनी शिक्षणासह आदिवासी बहुल ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा साधता येईल, याविषयावर मार्गदर्शन केले. मीनाक्षी बढे यांनी आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या विविध योजनांविषयी माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. दरम्यान शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले व पालक मेळावा घेण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन एस.के.बागडे तर उपस्थितांचे आभार जे.एम.चांदेवार यांनी मानले. याप्रसंगी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## ग्रंथालयांचे धोरण, डिजिटलायजेशनचे तोरण

### उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा निर्णय, ग्रंथालयांना मिळणार बळकटी

**गोंदिया :** शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये आणि शासकीय ग्रंथालयांचे बळकटीकरण, डिजिटलायजेशन आणि आधुनिकीकरण करण्याच्या अनुषंगाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्णय घेतला आहे. त्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली असून, ही समिती विविध शिफारशी करणार आहे. सर्व शासनमान्य ग्रंथालये व शासकीय ग्रंथालयांची सध्याची स्थिती, ग्रंथालयांचे डिजिटलायजेशन, स्मार्ट ग्रंथालय आणि डिजिटल कनेक्टिव्हिटी यासाठी आराखडा तयार करणे, कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, ई सामग्री व्यवस्थापन, डिजिटल साक्षरता वाढवण्यासाठी उपाययोजना सुचवणे, ग्रामीण भागातील ग्रंथालयांचे नेटवर्किंग एकात्मिक व्यवस्थापनाबाबत तसेच ग्रंथखरेदी प्रक्रियेविषयी मार्गदर्शन व शिफारशी, भारत सरकारच्या विविध योजनांमधून निधी मिळवण्यासाठी आधारभूत ठरेल असा प्रकल्प अहवाल तयार करणे, ग्रंथालयांकडून जनतेला लोकाभिमुख सेवा देताना येत असलेल्या अडचणींचा अभ्यास करून राज्यातील ही चळवळ बळकट करण्यासाठी एक समिती तयार करण्यात आली आहे. शासनाला ही समिती विविध शिफारस करणार आहे. याबाबतच्या शासन आदेशात नवीन ग्रंथालयांबाबत काहीच उल्लेख झालेला नाही. त्यातच २०१२ पासून नवीन ग्रंथालयांना मान्यता देण्यात आलेली नाही. परिणामी, त्याचा वाचन संस्कृतीवर परिणाम होताना दिसून येत आहे.

## जिल्ह्यातील 868 गावे झाली स्वच्छ सर्वेक्षणासाठी सज्ज

### १ हजार गुणांवर होणार मूल्यांकन

स्वच्छ ग्राम स्वच्छ जिल्हा
स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५
स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)

**गोंदिया :** देशभरात सुरू झालेल्या स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ अंतर्गत गोंदिया जिल्ह्यात मोहिमेला सुरुवात झाली आहे. जिल्ह्यातील ५४८ ग्रामपंचायतअंतर्गत ८६८ गावे या उपक्रमात सहभागी झाली आहेत.

या मोहिमेअंतर्गत केंद्र शासनाची नियुक्त समिती गावात येऊन स्वच्छता, प्लास्टिकमुक्ती, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन या बाबींची सविस्तर पाहणी करणार आहे. या पाहणीमध्ये ग्रामपंचायतींना एकूण १००० गुणांच्या आधारे मूल्यांकन करण्यात येणार असून, त्यात थेट निरीक्षण (१२० गुण), ग्रामस्थांचा प्रतिसाद (१०० गुण), गावातील सुविधा वापर (२४० गुण) आणि गृहभेट व प्रश्नावली (५४० गुण) यांचा समावेश आहे. सार्वजनिक सुविधा, स्वच्छता आणि प्लास्टिकमुक्त उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम मुरुगानंथम यांनी केले आहे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी फरेंद्र कुतिरकर यांनी सांगितले की, त्रयस्थ संस्था गावांमध्ये जाऊन तपासणी करणार असून, प्रत्येक ग्रामपंचायतीने आपापल्या गावातील शाश्वत स्वच्छता उपाययोजना प्रभावीपणे राबवाव्यात. स्वच्छतेच्या या उपक्रमातून सर्वात स्वच्छ आणि सुंदर गाव निवडण्यात येणार असून, ग्रामस्थांचा सहभाग आणि जनजागृती यावर गावांचे यश ठरणार आहे.

### स्थायित्वासाठी बचत गटांचा सहभाग आवश्यक

स्वच्छतेच्या सुविधा फक्त पाहणीपुरत्या न राहता भविष्यातही नियमितपणे सुरू राहाव्यात, यासाठी बचत गट वा स्थानिक संस्थांमार्फत व्यवस्थापन करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. यासाठीच जिल्हा परिषदेतील पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी फरेंद्र कुतिरकर यांनी समस्त ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, पाणी समिती सदस्यांनी सजगपणे कार्य करावे, असे आवाहन केले आहे.

## 21 शाळा, 14 अंगणवाड्यांचा वाली कोण ?

### भौतिक सुविधांचा अभाव : कुणीच दखल घेईना




**सालेकसा :** सालेकसा ग्रामपंचायतला नगरपंचायतचा दर्जा मिळाल्यानंतर सालेकसा व आमगाव-खुर्द परिसरातील एकूण सात प्राथमिक शाळा आणि १४ अंगणवाड्यांना जि.प.तर्फे भौतिक सोयी सुविधांसाठी आवश्यक साहित्य व अनुदान मिळणे बंद झाले. ग्रामपंचायतकडून मिळणारी मदत बंद झाल्याने व नगरपंचायतीच्या माध्यमातून सुद्धा कोणतेही अनुदान मिळत नसल्याने प्राथमिक शाळा, अंगणवाड्यांची स्थिती बिकट झाली आहे. त्यामुळे २१ शाळा आणि १४ अंगणवाड्यांचा वाली कोण, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

सालेकसा नगरपंचायतच्या हद्दीत शहरासह ग्रामीण भागाचा सुद्धा समावेश आहे. ग्रामीण भागात वास्तव्यास असलेल्या नागरिकांना नगरपंचायतच्या माध्यमातून मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या नाही. या भागात शाळा, अंगणवाडी असल्या तरी त्याकडे सध्या कुणाचेच लक्ष नाही. नगरपंचायत क्षेत्रात १४ अंगणवाड्या आणि सात जिल्हा परिषदच्या शाळा आहेत. या शाळांना विकासकामांसाठी किंवा रंगरंगोटी व इतर सोयी सुविधांसाठी जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीमार्फत पुरविल्या जातात. पण नगरपंचायत क्षेत्रात येत असल्याने या शाळांना या सोयी सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. यासंदर्भात जि.प. व पं. स. कडे विचारणा केली तर नगरपंचायत क्षेत्रात येत असल्याचे सांगून मोकळे होतो. नगरपंचायत प्रशासनाकडे पाठपुरावा केला तर या शाळा, अंगणवाड्या जि.प.ने आमच्या सुपूर्द केल्या नसल्याने काहीच करता येत नसल्याचे सांगतात. या वादात विद्यार्थ्यांना मात्र शैक्षणिक सोयी सुविधा मिळण्यापासून वंचित राहावे लागत आहे.

### पोलिस पाटील संघटनेची कार्यकारिणी गठीत

**गोंदिया :** रावणवाडी पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीस पाटील संघटनेची नविन कार्यकारिणी गठीत करण्यासाठी सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत कोल्हे होते. या सभेत सर्वानुमते नविन कार्यकारिणीचे गठन करण्यात आले. सभेत माजी अध्यक्ष आनंद तुरकर, सेवानिवृत्त पोलीस पाटील यादोराव बिसेन यांनी मार्गदर्शन केले. रावणवाडी पोलिस स्टेशन अंतर्गत पोलिस पाटील संघटनेचे काम सुव्यवस्थित पध्दतीने सुरू रहावे व पोलिस पाटलामधील समन्वयक कायम राखण्यासाठी नविन कार्यकारिणी गठीत करण्यात आली आहे.

## ग्रा.पं. कर्मचाऱ्यांच्या बेमुदत धरणे आंदोलनाला सुरुवात



**गोंदिया :** ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या १९ महिन्यांच्या वाढीव वेतन फरकाची रक्कम थेट कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात न जमा करता ग्रामपंचायतच्या खात्यात जमा केल्याच्या निषेधार्थ शुक्रवारपासून (दि. २७) ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेच्या वतीने पंचायत समिती समोर बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

शासन निर्णयानुसार १४ मे २०२५ रोजी गोंदिया पंचायत समितीकडे जमा झालेली रक्कम थेट कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा व्हायला हवी होती. मात्र ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या दबावाखाली ती रक्कम ग्रामपंचायतच्या खात्यात वळती करण्यात आली. त्यामुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक नुकसान झाले असून, यामागे हेतुपुरस्सर आर्थिक स्वार्थ असल्याचा आरोप ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेतर्फे करण्यात आला आहे. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने शासन निर्णयाची अंमलबजावणी करून रक्कम थेट कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची मागणी केली आहे. या आंदोलनाचे नेतृत्व मिलिंद गणवीर, देवेंद्र मेश्राम, विनोद सहारे, भाऊलाल कटंगकार, महेंद्र कटरे, राजेश भोकासे, महेंद्र भोयर, मुकेश बिसेन, सहेशराम माहुले, माणिक उके, रेखा सरनागत, सुनंदा दहीकर यांच्यासह इतर कार्यकर्ते करीत आहेत.

## पहिल्याच दिवशी मिळाला १६ विद्यार्थ्यांना एसटीचा पास

**गोंदिया :** राज्याचे परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार आता सरकारने विद्यालयात एसटीचे पास देण्याची व्यवस्था करण्याची घोषणा केल्याने लाखो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. एसटी प्रवासाचे पास मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना एसटी डेपोत जाऊन लांबच लांब रांगेत उभे राहण्याची गरज भासणार नाही. गोंदिया जिल्ह्यात पहिल्याच दिवशी तब्बल १६ विद्यार्थ्यांना एसटीचे पास देण्यात आले. आता उर्वरित विद्यार्थ्यांना अर्ज वाटप करणे सुरू झाले आहे.

शाळा-कनिष्ठ महाविद्यालये आणि महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एसटी महामंडळ विविध प्रकारचे मासिक, त्रैमासिक आणि अर्धवार्षिक पास देते. आतापर्यंत हे पास एसटी डेपोत जाऊन मिळवावे लागत होते. नवीन योजनेनुसार शाळा-महाविद्यालयांमार्फतच सामूहिक अर्ज करून विद्यार्थ्यांना वर्गातच हे पास वितरित करण्यात येत आहेत.

पूर्वी हजारो विद्यार्थी एसटी डेपोमध्ये पास मिळवण्यासाठी दिवसभर रांगेत उभे राहत असत. कधी-कधी दोन-तीन दिवस प्रयत्न करावे लागत. त्यामुळे शाळेच्या सुरुवातीच्या दिवसांमध्ये विद्यार्थ्यांना पास मिळवण्यासाठी गैरहजर राहावे लागत होते. मात्र, आता विद्यार्थ्यांचा वेळ वाचणार आहे, तसेच शाळेपासून डेपोपर्यंतचा त्रास टळणार आहे. शाळेतच पासचे वितरण होत असल्याने सर्वांना वेळेत पास उपलब्ध होणार आहे.

## कृषी यंत्रावरील सबसिडी बंद केल्याने शेतकरी अडचणीत



**गोंदिया :** जिल्हा ॲग्रो डीलर असोसिएशनच्या वतीने शेतकऱ्यांना कृषी यंत्रे व साहित्य खरेदी वरील सबसिडी मिळण्यात होत असलेल्या अडचणीबाबत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. २७ मार्चच्या तालुका नियामक समिती बैठकीत दिलेल्या निर्णयानुसार १ जुलै २०२५ पासून वेळेत संप पुकारण्याचे ठरविण्यात आले आहे. या निर्णयामुळे अनेक शेतकऱ्यांचे अर्ज वेळेत मंजूर झाले नसल्याने त्यांना अनुदान मिळण्यास विलंब होत आहे.

गोंदिया जिल्हा ॲग्रो डीलर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. वत्सलाल भगत, उपाध्यक्ष मुकेश अग्रवाल व सचिव भगवान मरेठे यांच्या नेतृत्वात सादर केलेल्या निवेदनानुसार, ३१ मार्च २०२५ पर्यंत कृषी यंत्रांकरिता अर्ज दाखल करणाऱ्या शेतकऱ्यांचे अर्ज तालुकास्तरावर प्रलंबित ठेवण्यात आले.

यामुळे सुमारे ९० टक्के शेतकरी अनुदानापासून वंचित राहण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. मार्च महिन्यात काही दिवस कृषी यंत्रे वितरित करण्याचे पोर्टल बंद होते. त्यामुळे शेतकरी आवश्यक माहिती व कागदपत्र वेळेत अपलोड करू शकले नाही. तसेच विक्रेत्यांकडे देखील पोर्टलवर नोंदणी करताना अडचणी आल्या. यामुळे शेतकऱ्यांनी भरलेले अर्ज वेळेत यादीत टाकण्यात आले नाही. शेतकऱ्यांचे अर्ज पुन्हा मंजूर करून त्यांना अनुदान देण्यात यावे, अशी मागणी ॲग्रो डीलर असोसिएशनने केली आहे.

## पावसाळयात धोका; पाच महिन्यांत १७ जणांना 'स्नेक बाइट'

### आरोग्य यंत्रणा सतर्क : रुग्णालयांत 'अँटी स्नेक व्हेनम' लसी सज्ज



**गोंदिया :** पावसाळयामुळे सर्पदंशाचा संभाव्य धोका लक्षात घेता आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये ७३८ 'अँटी स्नेक व्हेनम' लसी उपलब्ध माहिती असल्याची आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे. जानेवारी ते मे या पाच महिन्यांत १७जणांना सापाने चावा घेतल्याची नोंद आरोग्य विभागाकडून करण्यात आली आहे. जिल्ह्यात मागील वर्षी सर्पदंशाचे १०० पेक्षा अधिक रुग्ण आढळले. यामध्ये १० जणांचा मृत्यू झाला होता.

जिल्ह्यातील ग्रामीण भागात मुख्यत्वे करून नाग, घोणस, मण्यार आणि फुरसे हे विषारी साप आढळतात विषारी सापांमुळे शेतकरी, मजूर आणि ग्रामीण भागातील रहिवाशांना धोका असतो. सापांचे बीळ पाण्यामुळे असुरक्षित होतात. त्यामुळे साप शेतात, वस्तीत किंवा गवतात लपून बसतात. यामुळे विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले यांनी केले आहे.

पावसाळयात सापांचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता ग्रामस्थांनीव शेतकऱ्यांनी सावध राहावे आणि स्थानिक सर्पमित्रांचा संपर्क क्रमांक जवळ ठेवावा, असेही त्यांनी सुचवले आहे. नागरिकांनी याकडेही लक्ष देण्याची गरज आहे.

### सावधगिरी म्हणून काय कराल?

स्थानिक सर्पमित्रांचे संपर्क क्रमांक जवळ ठेवा आणि आपत्कालीन परिस्थितीत त्यांच्याशी संपर्क साधा. पावसाळयात शेतात काम करताना किंवा गवतात चालताना काठीने जमीन तपासा. मुलांना सापांबद्दल माहिती द्या आणि त्यांना साप दिसल्यास गावातील मोठ्या व्यक्तींना सांगण्यास शिकवा. आरोग्य केंद्रांमध्ये उपलब्ध असलेल्या अँटी व्हेनम लसचा वापर केवळ प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचाऱ्यांनीच करावा. सर्पदंशाच्या घटना टाळण्यासाठी ग्रामपंचायतींनी गावात स्वच्छता मोहीम राबवावी. आणि सापांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना कराव्यात.

: आरएनआय रजिस्ट्रेशन क्रमांक :
No-MAHMAR 2011/40516
महासागर गोंदिया
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय : शुभमंगल कार्यालय, एलआयसी ऑफीसजवळ, गणेशनगर, गोंदिया येथून प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन-०७१२-२७६७२८, ९३७३११७०४२ स्थानिक संपादक : जयंत मदनलाल शुक्ला, फोन ९८२२३८६९९९ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील)

